**(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय, भाग-६ अ करिता)**

क्र. पोमसं/८/६८०/ पदोन्नती २०१८-१९ (प्रलि/ वश्रेलि)/१६२/२०१८ (सीई-८८) मुंबई, दिनांक :- 04 /०४/२०१९.

वाचा:- शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०१७/ प्र.क्र.३१२A/ १६-ब, दि.२९.१२.२०१७

**-: आदेश -१ :-**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शहर लिपिक संवर्गातील श्रीमती वैदेही विवेक धुरी, वरिष्ठ श्रेणी लिपिक (गट-क) यांना त्यांनी कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून प्रमुख लिपिक (अराजपत्रित गट-क) पदी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात* पदोन्नती देण्यात येत असून पदोन्नतीवर त्यांची नेमणूक पोलीस महासंचालक कार्यालयातील कार्यासन क्रमांक २ मधील रिक्त असलेल्या प्रमुख लिपिक पदावर करण्यांत येत आहे

**-: आदेश -२ :-**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शहर लिपिक संवर्गातील कु. अंकिता अनंत पोवार, लिपिक टंकलेखक यांना त्यांनी कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून वरिष्ठ श्रेणी लिपिक (अराजपत्रित गट-क) पदी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात* पदोन्नती देण्यात येत असून पदोन्नतीवर त्यांची नेमणूक पोलीस महासंचालक कार्यालयातील कार्यासन क्रमांक ३४ मधील रिक्त असलेल्या वरिष्ठ श्रेणी लिपिक पदी करण्यांत येत आहे

(*उपरोक्त प्रमाणे देण्यात आलेली पदोन्नती ही शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२A/१६-ब, दि.२९.१२.२०१७ अन्वये देण्यात आलेल्या आदेशानुसार सेवाज्येष्ठतेनुसार व विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ मधील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात देण्यांत येत आहेत.)

२. **उपरोक्त प्रमाणे पदोन्नती/ बदली झालेल्या कर्मचारी यांनी त्यांच्याकडील प्रलंबित संदर्भ व प्रतिक्षाधीन प्रकरणांची यादी पदमोचक लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांकडे किंवा संबंधित पर्यवेक्षीय अधिकारी यांचेकडे न चुकता दयावी. त्याशिवाय त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त होता येणार नाही, याची कृपया त्यांनी नोंद घ्यावी.**

३. उपरोक्त पदोन्नतांना शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीएच्वाय/१०८२ / सीआर् / ११०० (२)/असईआर-३, दि. ०६/११/१९८४ नुसार पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल तर त्यांनी तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याच्या आंत द्यावा व अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती म.ना.सेवा (वेतन) नियम ११ (१) (अ) अन्वये केली जाईल यांची त्यांनी नोंद घ्यावी.

**डॉ. प्रज्ञा सरवदे,**
अपर पोलीस महासंचालक,(प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :-

श्रीमती वैदेही विवेक धुरी, वरिष्ठ श्रेणी लिपिक, का.क्र.३४
(मार्फत :- सह संचालक, (वित्त व लेखा) पोलीस महासंचालक कार्यालय)
कु. अंकिता अनंत पोवार, लिपिक टंकलेखक,
(मार्फत कार्यासन अधिकारी कार्यासन क्रमांक २५)

**प्रत सस्नेह अग्रेषित :-**

अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई.

**प्रत माहितीकरिता :-**

अपर पोलीस महासंचालक (आस्थापना), महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), महाराष्ट्र राज्य, मुंबई
सह संचालक, (वित्त व लेखा) पोलीस महासंचालक कार्यालय
वरिष्ठ उपसहायक पोलीस महानिरीक्षक (आस्थापना-१)
पोलीस महानिरीक्षक यांचे उपसहायक (गुन्हे) / (लेखा)
कार्यासन अधिकारी, का.क्रमांक ०२, २५, ३२,३४ व ३६,

२. पदोन्नती झालेल्या उपरोक्त कर्मचारी यांना त्यांनी उपरोक्त आदेशामधील परिच्छेद क्र.२ च्या अनुषंगाने आवश्यक बाबींची पुर्तता केल्यानंतर संबंधीत कार्यालय प्रमुखांनी / पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांनी नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी **तात्काळ** कार्यमुक्त करावे व अनुपालन अहवाल या कार्यालयास (का.क्र.०८ ला लक्षवेध करुन) सादर करावा.

- पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, मुंबई

२. पोलीस उप अधीक्षक यांनी सदरचे आदेश पोलीस महासंचालक कार्यालयाच्या संकेतस्थळावर www.mahapolice.gov.in येथे १ महिन्यांसाठी उपलब्ध करुन दयावेत.

**( अनुप कुमार सिंह)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

D:\20160106\Shankar\Promotion 2018-2019\Promotion Order 2018.docx